# University inter college Achievements 2025-26.

1) Table Tennis – Boys – 2nd prize.
2) 3 Students selection for Konkan zone Team.



पुढारी

संक्षिप्त

## घरडा अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांची मुंबई विद्यापीठाच्या स्पर्धेसाठी निवड

**खेड शहर :** मुंबई विद्यापीठाच्या रत्नागिरी, रायगड, सिंधुदुर्ग या कोकण विभाग झोन नं. ०४ मधून मुंबई विद्यापीठाच्या आंतरविभागीय टेबल टेनिस स्पर्धेसाठी ५ खेळाडूंपैकी घरडा महाविद्यालयाच्या २ विद्यार्थ्यांना संधी मिळाली आहे. यामध्ये सर्वेश सुनील चव्हाण व पार्थ मनोज शिंदे यांचा सहभाग आहे. पुढील स्पर्धा मुंबई विद्यापीठ कॅम्पसमध्ये होणार असून त्यांना पुढील वाटचालीस क्रीडा शिक्षक प्रा. संजय बोले, क्रीडा कमिटी समन्वयक प्रा. ढवळे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रमोद पाटील , उपप्राचार्य डॉ. सचिन पाटील, रजिस्ट्रार प्रा. संदीप मुंघाटे व सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी शुभेच्छा दिल्या.



सर्वेश चव्हाण



पार्थ शिंदे

## कोमसापची वार्षिक सभा शनिवारी कुडाळमध्ये

**लांजा :** कोकण मराठी साहित्य परिषदेची ३२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा २० सप्टेंबर रोजी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कुडाळ येथील मराठा समाज सभागृहात सकाळी ११. ४५ वाजता आयोजित करण्यात आली आहे. कोकण मराठी साहित्य परिषदेच्या केंद्रीय अध्यक्षा नमिता कीर यांच्या अध्यक्षतेखाली ही सभा होणार आहे. या सभेत मागील वर्षीच्या जमा-खर्चाचा तपशील सादर करून मंजुरी घेणे, २०२५ ते २६ च्या आर्थिक नियोजनास मान्यता घेणे, कार्यकारिणीने सूचविलेल्या घटना दुरुस्तीस मान्यता देणे, सनदी लेखापाल नेमण्यास अनुमती घेणे, मुख्य समितींच्या निवड प्रक्रिया करून मंजुरी घेणे आदी विषयांवर चर्चा होणार आहे. तरी या सभेला सभासदांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन परिषदेतर्फे करण्यात आले आहे.

Ratnagiri Edition
Sep 18, 2025 Page No. 07
Powered by: erelego.com